आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१९ सप्टेंबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शेती उपकरणांशी संबधित वस्तू आणि सेवा करामधल्या सुधारणांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणं गरजेचं असल्याचं केंद्रीय कृषी मंत्र्यांचं प्रतिपादन

- गेल्या ६ वर्षात एकही निवडणूक न लढवलेल्या ४७४ राजकीय पक्षांची नोंदणी निवडणूक आयोगाकडून रद्द, लेखापरीक्षण अहवाल सादर न करणाऱ्या पक्षांना नोटीस

- गगनयान मोहिमेच्या अंतर्गत इस्रो वर्षअखेर यंत्रमानव अंतराळात पाठवणार

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि ओमान यांच्यात सामना सुरू

**<><><><><>**

कृषी वापरासाठीच्या उपकरणांशी संबधित वस्तू आणि सेवा करामधल्या सुधारणांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणं गरजेचं आहे असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज चौहान यांनी म्हटलं आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठा फरक पडेल, असं ते म्हणाले. या सुधारणेचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्याबाबत नवी दिल्ली इथं चौहान यांनी एक बैठक घेतली. या बैठकीनंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

**होल्ड- शिवराज सिंग चौहान बाइट**

शेतीसाठीची उपकरणं स्वस्त झाल्यामुळे शेतकऱ्यांवरचा खर्चाचा भार कमी होईल तसंच यांत्रिक शेतीला चालना मिळेल असं चौहान म्हणाले.

**<><><><><>**

जीएसटी परिषदेनं अनेक वस्तू आणि क्षेत्रांमधले जीएसटीचे दर कमी केले आहेत. यामुळं अनेक वाहने स्वस्त होणार आहेत. दुचाकी तयार करण्यासाठी

वापरल्या जाणाऱ्या भागांवर लागणारा जीएसटी सरकारनं २८ टक्क्यांवरून १८ टक्के इतका केला आहे. तसंच, १० प्रवासी क्षमता असलेल्या बसवरचा जीएसटीही २८ वरून १८ टक्के करण्यात आला आहे. यामुळे देशांतर्गत मागणी आणि निर्यातीला प्रोत्साहन मिळेल, असा अंदाज आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर रचनेच्या सुसूत्रीकरणामुळे अनेक वस्तूंवरचा कर कमी होणार आहे. मात्र त्याचा आर्थिक बोजा सरकारवर फारसा पडणार नाही, असं क्रिसिल या पतमानांकन संस्थेनं म्हटलं आहे. अल्पमुदतीसाठी जीएसटी महसुलात वर्षाला ४८ हजार कोटी रुपयांची घट होईल असा सरकारी अंदाज आहे. मात्र एकूण महसुलाच्या दृष्टीनं ही तूट फार गंभीर नसल्याचं क्रिसिलच्या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने ४७४ नोंदणीकृत आणि मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांना यादीतून काढून टाकलं आहे. गेल्या सहा वर्षात या पक्षांनी एकही निवडणूक लढवलेली नव्हती. त्यामुळं हा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या महिन्यात निवडणूक आयोगानं अशा इतर ३३४ पक्षांवर कारवाई केली होती.

गेल्या तीन आर्थिक वर्षांत वार्षिक लेखापरीक्षणाचे अहवाल सादर न केल्यामुळे ३५९ नोंदणीकृत आणि मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश संबंधित राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आले आहेत. या अहवालानंतर संबंधित पक्षांना सुनावणीद्वारे आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतरच पुढची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यातल्या राजुरा विधानसभा मतदारसंघात बनावट मतदार नोंदणीचे प्रयत्न निवडणूक अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे रोखल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं पत्रकाद्वारे दिली आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही माहिती दिली आहे.

राजुरा मतदार नोंदणी कार्यालयात १ ते १७ ऑक्टोबर २०२४ यादरम्यान एकंदर ७ हजार ५९२ नवीन मतदार नोंदणी अर्ज आले. त्यांच्या छाननीदरम्यान दिलेल्या पत्त्यावर अर्जदार राहात नसणं, अर्जदार अस्तित्वातच नसणं, आवश्यक छायाचित्रं, पुरावे जोडलेले नसणं अशा त्रुटी आढळून आल्या. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सर्वच अर्जांची सखोल चौकशी आणि आवश्यक ती फौजदारी कारवाई करायचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले. याचा तपास अद्याप सुरू असल्याचंही पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

गगनयान मोहिमेअंतर्गत पहिली मानवरहित मोहीम याच वर्षी डिसेंबर महिन्यात होणार असल्याची माहिती इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी आज बेंगळुरूत दिली. मोहिमेच्या या टप्प्यात अंतराळयानाच्या तपासणीसाठी यात यंत्रमानवाला पाठवलं जाईल. अशा आणखी दोन मोहिमा होतील, त्यानंतर २०२७ च्या सुरुवातीला मानवाला घेऊन गगनयान अवकाशात झेपावेल, असंही नारायणन यांनी नमूद केलं. गगनयान मोहिमेसाठीचं ८० ते ८५ टक्के काम पूर्ण झाल्याचं त्यांनी सांगितलं. याशिवाय, भविष्यात मानवाला चंद्रावर घेऊन जाण्याची क्षमता असलेल्या रॉकेटवरही इस्रो काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय आणि राज्य औषध नियंत्रक प्राधिकरणानं ऑगस्ट महिन्यात तपासलेल्या औषधांपैकी ९४ औषधांचे नमुने गुणवत्तेच्या निकषानुसार नसल्याचं, केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेनं आज जाहीर केलं. यापैकी ३२ नमुने केंद्रीय

प्रयोगशाळेत तर ६२ नमुने राज्य प्रयोगशाळेत तपासलेले आहेत. ही माहिती संस्थेच्या पोर्टलवरही प्रसिद्ध करण्यात आली आहे. गुणवत्तेच्या निकषानुसार नसलेली आणि बनावट औषधं ओळखून ती बाजारातून हटवण्यासाठी नियमितरित्या ही कारवाई केली जाते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या भेटवस्तूंचा सध्या लिलाव सुरू आहे. त्यात सुमारे १ हजार ३०० हून अधिक भेटवस्तू आहेत. त्यातल्या १०१ वस्तू राज्यातल्या आहेत. राज्याची समृद्ध सांस्कृतिक, आध्यात्मिक परंपरा यातून प्रतिबिंबित होते.

**<><><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. देशातल्या महिला सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने उचललेल्या पावलांविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड.. व्हॉईस कास्ट**

*(गेल्या ११ वर्षांत केंद्र सरकारने सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात महिलांना सक्षम करण्यासाठी व्यापक धोरण आखलं आहे. नारीशक्ती या अभियानामुळे महिलांना सन्मान, सुरक्षा आणि स्वावलंबन प्रदान केलं आहे. हिंसाचार तसंच लिंगाधारित भेदभावापासून घटनात्मक संरक्षण ते परिवर्तनकारी योजनांपर्यंत महिलांच्या विकासासाठी केंद्र सरकारने विशेष प्रयत्न केले आहेत. बेटी बचाओ, बेटी पढाओ या योजनेमुळे लिंग गुणोत्तरात लक्षणीय फरक दिसून आला आहे. जानेवारी २०१५मध्ये सुरू झालेल्या सुकन्या समृद्धी योजनेमुळे भारतातल्या अनेक तरुणींना सक्षमीकरणासाठी मदत मिळाली आहे. लखपती दीदी मोहिमेमुळे स्वयंसहायता गटांना दरवर्षी किमान एक लाख रुपये उत्पन्नाची हमी मिळाली आहे. या विविध योजनांमुळे तळागाळातल्या प्रशासन व्यवस्थेपासून ते संरक्षण दल, विमान वाहतुकीपर्यंत महिला आता सर्वच क्षेत्रात नेतृत्व करत आहेत.*

***होल्ड.. बाईट- प्रधानमंत्री)***

**<><><><><>**

प्रसिद्ध आसामी गायक झुबिन गर्ग यांचं सिंगापूर मध्ये स्कूबा ड्रायव्हिंग अपघातात निधन झालं. ते ५२ वर्षांचे होते. गर्ग हे सिंगापूर इथे नॉर्थ ईस्ट

फेस्टिव्हलमध्ये सहभागी होण्यासाठी गेले होते. क्रिश ३, गँगस्टर, नमस्ते लंडन यासारख्या चित्रपटात त्यांनी गाणी गायली होती. याशिवाय संगीतकार, संगीत दिग्दर्शक, अभिनेता आणि चित्रपट निर्माता म्हणूनही त्यांनी काम केलं होतं. आसामी, हिंदी, बंगाली आणि इतर अनेक भारतीय भाषांमधल्या गाण्यांना आपला आवाज दिला होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि ओमान यांच्यात सामना सुरू आहे.  अबूधाबीच्या शेख झायेद मैदानावर होत असलेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. ५ धावा काढून शुभमन गिल बाद झाला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या दुसऱ्या षटकात १ बाद ६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

सर्व स्वरूपातल्या दहशतवादाविरोधात लढा अधिक बळकट करण्याचं आवाहन भारतानं जागतिक समुदायाला केलं आहे. परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत माध्यमप्रतिनिधींना सांगितलं की,  प्रत्येक देशानं सीमापार दहशतवादाचा निकरानं मुकाबला केला पाहिजे. ब्रिक्स, शांघाय सहकार्य संघटना आणि इतर कोणत्याही मंचावर संमत झालेल्या सर्व ठरावांमधे दहशतवादाचा कडाडून विरोध असला पाहिजे असं आग्रही प्रतिपादन त्यांनी केलं.

**//<><><><><>//**